मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कोंडी अन् फूटपाथावरील अतिक्रमण होतेय डोकेदुखी!

## देहू-आळंदी रस्त्यावरील परिस्थिती






**मोशी**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
देहू आळंदी रोड चिखली ते मोशीतील भारतमाता चौक दरम्यान फूटपाथावर विक्रेत्यांनी अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांना चालण्यास अडथळा येत आहे. तसेच चालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो आहे. या रस्त्यावरील वाहतूक कोंडीने वाहनचालक त्रस्त झाले आहेत. चिखली भाजीमंडईपासून रस्त्यावरील फूटपथावर अतिक्रमण केल्याचे चित्र पहायला मिळते. महापालिकेचे अतिक्रमण पथक येते,त्यानंतर पुन्हा जैसे थे परिस्थीत होते. हाथगाड्या, टपऱ्यांनी विळखा घातला आहे. पाटीलनगर परिसरातील काही सोसायट्यांच्या बाहेर टपऱ्यांनी विळखा घातला आहे. वाहतूक पोलिस असतानाही अडवे-तिडवे वाहन घातली जातात. नियमांची ऐसी का तैसी या रस्त्यावर पहायला मिळते. दिवसा अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते आहे. तसेच मोशीत रस्त्यावर अवजड वाहने थांबविल्यानेही वाहतूक कोंडीचा सामना चालकांना करावा लागतो आहे.



“ कुदळवाडीपासून पुढे मोशीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला असलेले फूटपाथ पूर्ण तुटले आहे. त्याचा वापर व्यवस्थितरित्या करता येत नाही. त्यामुळे या फूटपाथाचे काम लवकर व्हावे.
**-दिनेश यादव,** सामाजिक कार्यकर्ते



“ सायंकाळच्या वेळी सध्या अतिक्रमण कारवाई केली जात आहे. मात्र एक गाडी कायमस्वरूपी या ठिकाणी ठेवण्याची सोय आपण करणार आहोत. फूटपाथ रिकामा ठेवल्यास नागरिकांना चालण्यास सोपे होईल.
**-आण्णा बोधडे,** क प्रभाग सहाय्यक आयुक्त



“ देहू-आळंदी रस्त्यावरील वाहतूक कोंडीने वाहनचालकांना नकोसे झाले आहे. अवजड वाहने, अतिक्रमण, रस्त्याच्या कडेला लावलेल्या अडव्या-तिडव्या दुचाकी यामुळे वाहनचालकांना गाडी चालवताना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.
**-अतिश बारणे,** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष

# महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची कारकिर्दी वादग्रस्त

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्याची नाराजी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच शहरातील विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. या कार्यक्रमादरम्यान महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याविषयी असलेली दोन्ही नेत्यांची नाराजी दिसून आली. महापालिकेच्या नाट्यगृहांकरिता आकारला जाणारा अव्वाच्या सव्वा दराबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली, तर महापालिकेच्या काही विषयांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना हस्तक्षेप करावा लागत आहे, ही परिस्थिती महापालिका आयुत शेखर सिंह यांच्या



दृष्टीन अडचणीची ठरू शकते. महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक लांबल्याने दीड वर्षांपासून पिंपरी-चिंचवडकर प्रशासक राजवटीचा अनुभव घेत आहेत. या कालावधीत महापालिकेचा कारभार ढेपाळला आहे. लोकप्रतिनिधींअभावी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याकरिता आयोजित केल्या जाणाऱ्या जनसंवाद सभांची संख्या कमी करण्यात आली आहे. आजमितीस आयुक्तांच्या सह्यांकरिता फाइलींचा ढीग पडला आहे. मात्र, त्या फाइलॉवर सह्या करण्यासाठी आयुक्तांना वेळ मिळत नसल्याचे चित्र आहे. प्रशासकीय राजवटीत आपल्या समस्या सुटत नसल्यास अनेक नागरिकांना, विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींना आयुक शेखर सिंह यांच्या कानावर ही बाब घालणे योग वाटते. मात्र. त्यांच्याकडे गेल्यानंतर देखेंगे, करेंगे अशी ठराविक साचेबद्ध उत्तरे दिली जात असल्याने नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. शहरातून वाहणाऱ्या इंद्रायणी नदी प्रदुषणाचा मुद्दा चांगलाच गाजत आहे.

# पवनाथडी जत्रेस उत्स्फुर्त प्रतिसाद!

## खव्वयांनी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सच्या बाहेर केली गर्दी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** यंदाच्या पवनाथडी जत्रेत पिंपरी चिंचवड शहरवासियांना शहरी आणि ग्रामीण संस्कृतीचा मिलाप पाहायला मिळत आहे. चविष्ट अशा महाराष्ट्रीयन पाककलेच्या समृद्ध वारशाचा आनंद घेण्यासाठी खव्वयांनी शाकाहारी आणि मांसाहारी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सच्या बाहेर गर्दी केली. यंदाच्या जत्रेमध्ये प्रवेशद्वारापासूनच वैविध्यपुर्ण सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे जी आकर्षित करणारी ठरली आहे. तर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाने संध्याकाळी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झालेले पाहायला मिळाले. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे तसेच महिलांचे सबलीकरण करण्यासाठी




महापालिकेच्या वतीने ११ जानेवारी ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रा भरविण्यात आली आहे. या पाच दिवसीय जत्रेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी जत्रेचा आनंद घेण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. महापालिकेच्या वतीने आयोजित पवनाथडी जत्रा लोकांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे. याठिकाणी केलेली नेत्रदिपक विद्युत रोषणाई, रचनात्मक स्टॉल्सच्या रांगा, पारंपारिक बैलगाडी व शेती साहित्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असून सेल्फी काढण्यासाठी याठिकाणी लोकांची गर्दी होत आहे. जत्रेमध्ये स्त्रियांसाठी कॉस्मेटिक्स, बॅग्स, साड्या, भांडी तर लहान मुलांसाठी खेळणी, पुस्तकं, कार्टूनच्या बाहुल्यांची असंख्य स्टॉल्स उपलब्ध आहेत. इतकंच नाही तर वेगवेगळी लोणची, पापड, कुरड्या, डाळी अशा घरगुती पदार्थांची खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी वाढताना दिसत आहे. पुरुषांसाठी चप्पल-बुट, खादीचे कपडे, कुर्ते, टोप्या, रुमाल, गॉगल्स, ब्रेसलेट्स, घड्याळ इत्यादींचे स्टॉल्स पाहायला मिळत आहेत. तर हुरड्यासह विविध शुद्ध शाकाहारी तसेच चमचमीत मांसाहारी खाद्यपदार्थांच्या मेजवाणीवर खवय्ये ताव मारताना दिसत आहेत. या जत्रेमध्ये लहान मुलांसोबत तरूण, ज्येष्ठ नागरिकही आकाशी पाळणा, ड्रॅगन ट्रेन, झिग झॅग रोलर अशा अनेक अंगावर शहारे आणणाऱ्या खेळण्यांचा अनुभव घेताना दिसत आहेत. जत्रेच्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांची बैठक व्यवस्था असलेले सांस्कृतिक दालन उभारण्यात आले आहे.

जेथे ऑर्केस्ट्रा, नाटक, लावणी, गोंधळ, सनई चौघडा, वाघ्या-मुरळींची जुगलबंदी अशा अनेक लोककलांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून विविध भागातील पारंपरिक कलाकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. शुक्रवारी सायंकाळी 'म्युझिक मेकर्स' हा सुमधूर गीतांचा बहारदार कार्यक्रम पार पडला ज्यामुळे उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर 'खेळ रंगला पैठणीचा- होम मिनिस्टर' हा कार्यक्रम सादर झाला ज्यामध्ये अनेक महिलांनी सहभाग घेतला. दरम्यान, दिव्यांग, तृतीयपंथींच्या सामाजिक व आर्थिक समावेशनासाठी महापालिकेच्या वतीने प्रयत्न करण्यात येत असून त्यांच्यासाठीही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यांच्याद्वारेही येथे विविध वस्तू, खाद्यपदार्थांची विक्री करण्यात येत आहे. यासोबतच १८ ते ३० वयोगटातील युवक व युवतींसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी महापालिका राबवित असलेल्या लाईट हाऊस उपक्रमात तरूणांनी सहभाग घ्यावा, त्याबाबत माहिती घ्यावी यासाठी माहिती कक्ष उभारण्यात आला आहे. या स्टॉललाही तरूणांचा उस्फुर्त प्रतिसाद भेटत असल्याचे दिसुन येत आहे. पवनाथडी जत्रेच्या ठिकाणी कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेचे कर्मचारी, कायदा व सुव्यवस्थेसाठी सुरक्षा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे कर्मचारी आणि पोलीस दलाच्या जवानांसह आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास अग्निशमन बंब, सुसज्ज रुग्णवाहिका तैनात करण्यात आली असल्याची माहिती समाज विकास विभागाचे उपआयुक्त अजय चारठाणकर यांनी दिली आहे.

# शहरातील गुरुवारचा पाणीपुरवठा बंद, शुक्रवारचा विस्कळीत!

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिके कडील पाणीपुरवठा विभागाच्या अशुध्द जलउपसा केंद्र, रावेत आणि पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेअंतर्गत यंत्रणेची आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील गुरुवारी सायंकाळचा पाणीपुरवठा बंद तर शुक्रवारचा



विस्कळीत राहणार आहे. रावेत नदी जलउपसा केंद्र येथील गुरुवार १८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रावेत येथील जलउपसा केंद्र बंद राहणार असल्याने पिंपरी-चिंचवड शहराचा १८ जानेवारी रोजी सायंकाळी होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवार दिनांक १९ जानेवारी रोजी होणारा सकाळचा पाणीपुरवठा अनियमीत व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी मनपाकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करुन काटकसरीने पाणी वापर करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# ओवासण्यासाठी देहूत महिलांची गर्दी

**देहू**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** मकर संक्रातनिमित्त हजारो सुवासिनींनी देहूतील संत तुकाराम महाराज मुख्य मंदिरात सोमवारी पहाटेपासून गर्दी केली होती. एकमेकींना हळदी कुंकू लावत, तिळगूळ घ्या, गोड बोला म्हणत मकर संक्रांत उत्साहात साजरी केली. पुरुषांना मंदिरात प्रवेश देण्यात आला नाही. पहाटेपासून विविध गावांतून महिला देऊळवाड्यात दाखल होत होत्या. सोबत ओवासण्यासाठी बोर, गाजर, ऊस, घेवडा, गव्हाची ओंबी, खण, तिळगूळ, हळदी कुंकू आणले होते. विठ्ठल रुक्मिणीच्या मंदिरात महिलांनी दर्शन घेतले. तिळाचे लाडू, तिळगूळ देऊन गोड बोलण्याचे आवाहन केले. शिरूर, आंबेगाव, जुन्नर तालुक्यातून दर्शनासाठी महिला उपस्थित होत्या.

# विद्यापीठांचे दरवाजे गरिबांना बंद

## विद्यापीठातील प्रवेशासाठी शिष्यवृत्ती न देण्याची तरतूद

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारने राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना खासगी विद्यापीठांचे दरवाजे बंद करणारे विधेयक पारित केले आहे. या विधेयकानंतर आता खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्य सरकारने जूनमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील १० टक्के विद्यार्थ्यांना ५० टक्के शुल्क सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता हे विधेयक पारित करण्यात आले आहे. आमदार कपिल पाटील यांनी या बाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली. राज्य अध्यक्ष अतुल देशमुख, छात्रभारतीचे रोहित ढाले, सूरज पंडित, स्टुडंट हेल्पिंग हँडचे कुलदीप आंबेकर, नीलेश निंबाळकर या वेळी उपस्थित होते.गेल्या काही वर्षांमध्ये राज्यात खासगी विद्यापीठांची संख्या वाढत आहे. नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खासगी विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण आणि सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधेयकाबाबतची माहिती, तपशील दिला नाही. या विधेयकावर विधानसभेत कोणतीही चर्चा न होता ते मंजूर करण्यात आले, तर विधानपरिषदेतही अशाच पद्धतीने गदारोळात मांडून मंजूर करण्यात आले. या विधेयकामधील तरतुदी विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच हे विधेयक समाजात पोहोचलेले नसल्याने त्याच्या परिणामांची कल्पना आलेली नाही. मात्र, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचा भार सरकारवर आणि खासगी विद्यापीठांवर पडू नये, यासाठीचे हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. या विधेयकामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्यातील कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरूनच शिक्षण घ्यावे लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षीपासून या विधेयकाचे चटके बसणार आहेत. खासगी विद्यापीठांचे शुल्क भरमसाठ असल्याने, मध्यमवर्गीय, गरीब आणि आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणच घेता येणार नाही. खासगी विद्यापीठांचा सरकारवर दबाव आहे. तसेच सरकारला जबाबदारीतून अंग काढून घ्यायचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महाविद्यालये बंद केली जाणार आहे, असे पाटील यांनी सांगितले. खासगी विद्यापीठांबाबत विधानसभा आणि विधान परिषदेत पारित झालेल्या विधेयकावर राज्यपालांनी स्वाक्षरी केल्यावर त्याचे रुपांतर होणार आहे. त्यामुळे राज्यपालांनी विधेयक परत पाठवावे, यासाठी विनंती करण्यासह या विधेयकाची राज्यभरात विविध ठिकाणी होळी केली जाणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. या विधेयकामधील तरतुदी विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच हे विधेयक समाजात पोहोचलेले नसल्याने त्याच्या परिणामांची कल्पना आलेली नाही. मात्र, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचा भार सरकारवर आणि खासगी विद्यापीठांवर पडू नये, यासाठीचे हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे.




### राज्यपालांनी विधेयक परत पाठवावे

» या विधेयकामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्यातील कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरूनच शिक्षण घ्यावे लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षीपासून या विधेयकाचे चटके बसणार आहेत. खासगी विद्यापीठांचे शुल्क भरमसाठ असल्याने, मध्यमवर्गीय, गरीब आणि आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणच घेता येणार नाही. खासगी विद्यापीठांचा सरकारवर दबाव आहे. तसेच सरकारला जबाबदारीतून अंग काढून घ्यायचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महाविद्यालये बंद केली जाणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.खासगी विद्यापीठांबाबत विधानसभा आणि विधान परिषदेत पारित झालेल्या विधेयकावर राज्यपालांनी स्वाक्षरी केल्यावर त्याचे रुपांतर होणार आहे.

# कोल्हे आणि बारणे यांच्या खासदारकीवर आक्षेप

## निवडणूक निकालाविरोधात कारणे देत न्यायालयात याचिका

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून सन २०१९ मध्ये अनुक्रमे भाजपचे गिरीश बापट, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुप्रिया सुळे आणि डॉ. अमोल कोल्हे, तर शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे उमेदवार खासदार म्हणून निवडून आले. पुण्यातून ३१, तर बारामतीतून १८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शिरूर आणि मावळमधून अनुक्रमे २३ आणि २१ उमेदवार निवडणुकीला उभे होते. निवडणूक पार पडल्यानंतर या चारही मतदारसंघातील निवडणूक निकालाविरोधात विविध कारणे देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. या याचिका न्यायालयाने दाखल करून घेतल्या आहेत. या प्रकरणांची सुनावणी अद्याप सुरू आहे. परिणामी या निवडणुकीत वापरलेली मतदान यंत्रे मोहोरबंद करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत.या याचिकांचा निकाल लागत नाही, तोवर या निवडणुकीत वापरण्यात



आलेली मतदान यंत्रे तशीच ठेवावी लागतात. त्यामुळे बॅलेट युनिट, कण्ट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट अशी मिळून एकूण तब्बल २८ हजार मतदान यंत्रे गेल्या पाऊणे पाच वर्षांपासून धूळखात पडली आहेत.पुण्याचे खासदार बापट यांचे निधन झाल्याने पुणे लोकसभा मतदारसंघाची याचिका आपोआप निकाली काढण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात वापरण्यात आलेली मतदान यंत्रे बेंगळुरू येथे परत पाठवून देण्यात आली आहेत, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी सांगितले.परिणामी या निवडणुकीत वापरलेली मतदान यंत्रे मोहोरबंद करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत.या याचिकांचा निकाल लागत नाही, तोवर या निवडणुकीत वापरण्यात आलेली मतदान यंत्रे तशीच ठेवावी लागतात. पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून सन २०१९ मध्ये अनुक्रमे भाजपचे गिरीश बापट, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुप्रिया सुळे आणि डॉ. अमोल कोल्हे, तर शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे उमेदवार खासदार म्हणून निवडून आले. १८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शिरूर आणि मावळमधून अनुक्रमे २३ आणि २१ उमेदवार निवडणुकीला उभे होते. निवडणूक पार पडल्यानंतर या चारही मतदारसंघातील निवडणूक निकालाविरोधात विविध कारणे देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या.

# चार्जिंग स्टेशनमध्ये महापालिका भागीदार

## ५० टक्के नफ्याच्या भागिदारिसह इ चार्जिंग स्टेशनचा प्रकल्प सुरु

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे महापालिकेने ठेकेदारासोबत ५० टक्के नफ्याच्या भागिदारिसह इ चार्जिंग स्टेशनचा प्रकल्प सुरु केला आहे. पण यामध्ये रोज किती गाड्या चार्जिंग झाल्या, त्यासाठी प्रति युनिट किती शुल्क आकारण्यात आले, त्यातील नफा किती याबाबतची माहिती महापालिकेला सादर केली जात नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, यावर संबंधित कंपनीला पत्र देऊन सर्व व्यवहारांची चोख माहिती घेऊ असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. शहरात इ वाहनांची संख्या वाढत असताना पुणे महापालिकेने ८३ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभे करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली. यामध्ये पात्र ठरलेल्या कंपनीला शहरातील मोक्याच्या जागा ८ वर्षासाठी दिल्या आहेत. यातून मिळणाऱ्या उत्पन्नात ५० टक्के वाटा हा महापालिकेचा असणार आहे. ८३पैकी २१ ठिकाणी चार्जिंग सेवा सुरु करण्यात आली आहे.ठेकेदाराकडून चार्जिंगसाठी १३ ते १९ रुपये प्रति युनिट आणि १८ टक्के जीएसटी असे एकूण २२.४२ रुपये घेण्यास सुरुवात केली आहे. पण १३ ते १९ रुपये प्रति युनिट शुल्क कसे निश्चित केले आहे यावर प्रशासनाला समाधानकारक स्पष्टीकरण देता आलेले नाही. या प्रकल्पामध्ये महापालिका ५० टक्के भागीदार आहे, सर्व खर्च वगळता निव्वळ नफ्यातील ५० टक्के रक्कम महापालिकेला मिळणार आहे. पण आत्तापर्यंत किती गाड्यांचे चार्जिंग झाले, कोणत्या चार्जिंग स्टेशनवर किती गाड्या चार्ज करण्यात आल्या, आत्तापर्यंत एकूण किती शुल्क जमा झाले याची कोणतीही माहिती ठेकेदाराकडून महापालिकेला दिली जात नाही.पुणे महापालिकेने ठेकेदारासोबत ५० टक्के नफ्याच्या भागिदारिसह इ चार्जिंग स्टेशनचा प्रकल्प सुरु केला आहे. पण यामध्ये रोज किती गाड्या चार्जिंग झाल्या, त्यासाठी प्रति युनिट किती शुल्क आकारण्यात




> 'चार्जिंग स्टेशनमध्ये महापालिका ५० टक्के भागीदार आहे, या कंपनीकडून प्रत्येक महिन्याचा अहवाल दिला जाईल असे सांगण्यात आहे पण, हे मान्य नाही. चार्जिंग स्टेशनची दैनंदिन माहिती सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सर्व खर्च वगळता निव्वळ नफ्यातून ५० टक्के रक्कम महापालिकेला मिळणार आहे.'
>
> **- श्रीनिवास कंदूल,**
> **मुख्य अभियंता, विद्युत विभाग**


आले, त्यातील नफा किती याबाबतची माहिती महापालिकेला सादर केली जात नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, यावर संबंधित कंपनीला पत्र देऊन सर्व व्यवहारांची चोख माहिती घेऊ असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. शहरात इ वाहनांची संख्या वाढत असताना पुणे महापालिकेने ८३ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभे करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली. यामध्ये पात्र ठरलेल्या कंपनीला शहरातील मोक्याच्या जागा ८ वर्षासाठी दिल्या आहेत. यातून मिळणाऱ्या उत्पन्नात ५० टक्के वाटा हा महापालिकेचा असणार आहे. तसेच यासंदर्भात ऑनलाइन माहिती मिळविण्यासाठी ॲपवर ॲक्सेसही देण्यात आलेला नाही. त्यामुळे ५० टक्के भागीदारी असूनही या व्यवसायाबाबत कोणतीही माहिती विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही.

# पैसे कसे ढापायचे हे शरद पवार कुटुंब जगाला शिकवू शकतं

## कोविड काळात त्यांचा वसुलीचा धंदा सुरू होता : किरीट सोमय्या

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पैसे कसे ढापायचे हे शरद पवार कुटुंब जगाला शिकवू शकतं. कोविड काळात त्यांचा वसुलीचा धंदा सुरू होता. पवार कुटुंबातील प्रतापराव पवार यांच्या 'न्यू स्टार इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचा बारा वर्षांत एका दमडीचाही व्यवसाय झालेला नाही. अचानक मार्च २०२१ मध्ये 'सिरम इन्स्टिट्यूट'च्या बँक खात्यातून ४३५ कोटी शरद पवार परिवारातील प्रतापराव पवार यांच्या





या कंपनीत आले आहेत. हे सिरम कडून आलेलं कमिशन तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित करत दिल्लीला जाऊन याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.किरीट सोमय्या म्हणाले, पैसे कसे ढापायचे हे शरद पवार यांचे कुटुंब जगाला शिकवू शकते. कोविड काळात वसुलीचा धंदा सुरू होता. 'न्यू स्टार इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीचा बारा वर्षांत एका दमडीचा व्यवसाय नाही. अचानक मार्च २०२१ मध्ये सिरम इन्स्टिट्यूटच्या बँक खात्यातून ४३५ कोटी शरद पवार परिवारातील प्रतापराव पवार यांच्या कंपनीत आले आहेत. यांचं कॉन्ट्रिब्यूशन किती? केवळ एक लाख. मग, त्यांच्या खात्यात जमा झालेले ४३५ कोटी हे कमिशन आहे का? असा प्रश्न सोमय्या यांनी उपस्थित केला असून त्यांनी निगडीतील पीएमआरडीमध्ये रीतसर अर्ज केला आहे. या प्रकरणी दिल्लीला जाऊन पाठपुरावा करणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे.अचानक मार्च २०२१ मध्ये 'सिरम इन्स्टिट्यूट'च्या बँक खात्यातून ४३५ कोटी शरद पवार परिवारातील प्रतापराव पवार यांच्या या कंपनीत आले आहेत. हे सिरम कडून आलेलं कमिशन तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित करत दिल्लीला जाऊन याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.किरीट सोमय्या म्हणाले, पैसे कसे ढापायचे हे शरद पवार यांचे कुटुंब जगाला शिकवू शकते.